# प्रशासनाच्या नाकावर टिच्चून कोयना धरणात कुणी बांधलं हॉटेल?



**सातारा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला वरदान ठरलेल्या कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयात जावली तालुक्यातील मुनावळे येथे कोयना धरणाच्या संपादित जमिनीत नव्हे तर चक्क धरणात वन विभाग तसेच जलसंपदा विभागाचे सर्व नियम डावलून कोणाच्या वरदहस्ताने हॉटेल बांधले? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

जावली तालुक्यातील मुनावळे हे गाव वन विभागाच्या बफर झोन, कोरझोन, ग्रीन झोनमधे येत असून याठिकाणी कोणत्याही प्रकारची कायदेशीर परवानगी नसताना देखील बोट क्लब सुरू असून याठिकाणी कोयना धरणासाठी अधिग्रहण केलेल्या जमिनीवर कोयना धरण व्यवस्थापनाच्या नाकावर टिच्चून चक्क धरणात बेकायदेशीर बांधकाम करून हॉटेल बांधले एवढ्यावर न थांबता थेट धरणाच्या पाण्यात मोटरा टाकून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू आहे . इतकेच नव्हे तर याठिकाणी धरणाच्या पाण्यात शौचालयांचे पाणी सोडून येथील जैवविविधतेला बाधा पोहचवली जात असताना देखील प्रशासन गंधारीच्या भूमिकेत का? नेमकी कोणाच्या आशिर्वादाने कोयना धरणात बेकायदेशीर बांधकामे करुन हॉटेल व्यवसाय सुरू आहे असा सवाल जनमानसामध्ये उपस्थित होत आहे.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर कोयनेच्या खोऱ्यात बेकायदेशीर बांधकामे वाढली, असल्याची जोरदार चर्चा असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागातील विकास हा पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर करणार असल्याची घोषणा केल्यानंतर ,कोयना धरण क्षेत्रात धनदांडग्यांनी स्थानिकांना हथाशी धरून नियम धाब्यावर बसवत बेकायदेशीर बांधकामे करुन परिसरातील निसर्ग सौंदर्याला बाधा पोहचवली जात आहे. यामुळे जिल्हा प्रशासनान आणि जिल्हाधिकारी यांनी वेळीच लक्ष घालून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी या मागणीला जोर धरू लागला आहे.

# खा. उदयनराजेंच्या हस्ते केरळच्या शिवभक्त युवकाला सायकल भेट



**सातारा :** महाराष्ट्रातील गडकिल्ले भटकंती करणारा केरळचा युवक हमरास एम.के. यांचे साताऱ्यात शिवतीर्थ येथे स्वागत करण्यात आले होते. यावेळी माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी हमरास याच्या स्वागतासाठी पुढाकार घेत हमरास यास सायकल भेट देण्यात येणार होती. त्यानुसार आज जलमंदिर तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट तेरावे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांच्या हस्ते सायकल देण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वंशजाच्या हस्ते सन्मान केला गेल्याने हमरास भावूक झाला होता.

केरळ येथील युवक हमरास हा गेली आठ महिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने प्रेरीत होवून सायकलवरुन गडकोटांना ३७० किल्ल्यांना भेट देत आहे. त्याने आतापर्यंत महाराष्ट्रातील ११७ किल्यांना भेट दिली असून ११८ किल्यावर भेट देणार आहे. गेले चार दिवस हमरास साताऱ्यात आहे साताऱ्यातील अजिंक्यतारा व सज्जनगड येथे त्याने भेट दिली. सातारकरानी त्याचे स्वागत करुन खासदार उदयनराजे भोसले यांच्या मार्गशनाखाली माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी पुढाकार घेऊन हमरास यास सायकल भेट देण्याचा मानस केला होता आज जलमंदिर येथे खा उदयनराजे यांच्या हस्ते हमरास याला सायकल भेट दिली.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट तेरावे वंशज खा .उदयनराजे यांनी त्याची छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रती असलेली भक्ती पाहून त्याचे कौतुक केले.

## समलैंगिकते विरोधातील कायदे अन्यायकारक

■ पोप फ्रान्सिस यांची स्पष्टोक्ती

**व्हॅटिकन सिटी: वृत्तसंस्था**

समलैंगिकता हे पाप नाही. समलैंगिकतेला गुन्हा ठरविणारे कायदे अन्यायकारक आहेत, अशी स्पष्टोक्ती सर्वोच्च ख्रिस्ती धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांनी केली आहे. समलैंगिक व्यक्तींना धर्मगुरूंनी चर्चमध्ये सन्मानाने सामावून घ्यावे, अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

परमेश्वर आपल्या सर्वांवर सारखेच प्रेम करतो. आपण जसे आहोत तसे त्याला आवडत असतो. प्रत्येकाला आपला आत्मसन्मान जपण्याचे बळ तो प्रदान करता असतो. त्यामुळे समलैंगिक व्यक्तींना वेगळे पाडण्याची, बहिष्कृत करण्याची आवश्यकता नाही, असे पोप फ्रान्सिस यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले आहे.

आफ्रिका खंडातील आणि मध्यपूर्वेतील अनेक देशांमध्ये समलैंगिकतेला गुन्हा ठरविणारे कायदे आहेत. जगभरात किमान ६४ देशांमध्ये असे कायदे आहेत. त्यापैकी ११ देशांमध्ये या गुन्ह्याला देहांताची शिक्षा आहे. अनेक ख्रिस्ती धर्मगुरू अशा कायद्यांचे समर्थन करीत आहेत. अशा धर्मगुरूंचे कान पोप यांनी टोचले आहेत.

# राहुल गांधी यांच्या भारत जोडोला जम्मू काश्मीरमध्ये 'ब्रेक'



**जम्मू : वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा सध्या जम्मू काश्मीरमध्ये पोहोचली आहे. सप्टेंबर महिन्यात सुरु झालेली भारत जोडो यात्रा विविध राज्यांचा प्रवास करत जम्मू काश्मीरमध्ये पोहोचली आहे. ३० जानेवारी रोजी काश्मीरच्या श्रीनगरमध्ये भारत जोडो यात्रेचा समारोप होणार आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला रामबन जिल्ह्यात थांबवण्यात आलं आहे. सुरक्षेच्या कारणामुळं यात्रा थांबवण्यात आल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे. सुरक्षा व्यवस्था मिळाल्यानंतर पुन्हा भारत जोडो यात्रा सुरु होईल, असं सांगण्यात आलं आहे. यापूर्वी भारत जोडो यात्रा खराब वातावरणामुळं थांबवण्यात आली आहे. आज या यात्रेत जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला देखील सहभागी झाले होते.

राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा खराब वातावरणामुळं थांबवण्यात आली होती. जम्मू काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात यात्रा पुन्हा सुरु झाल्यानंतर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंद दिसून आलं होतं. मात्र, सुरक्षेच्या कारणामुळं भारत जोडो यात्रा पुन्हा थांबवण्यात आली आहे. काँग्रेस नेते के.सी. वेणुगोपाल राव यांनी यांनी सुरक्षेची व्यवस्था नसल्याचं म्हटलं आहे. जेव्हा सुरक्षा मिळेल तेव्हा यात्रा सुरु होईल, असं वेणुगोपाल म्हणाले आहेत.

राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा आज सकाळी ९ वाजता सुरु झाली होती. रामबाग येथून यात्रा अनंतबाग येथे जाणार होती. मात्र, बनिहाल येथेचं सुरक्षेच्या कारणामुळं यात्रेला ब्रेक लागला आहे. बनिहाल मध्ये उमर अब्दुल्ला राहुल गांधी यांच्यासह भारत जोडो यात्रेत चालताना दिसून आले.

उमर अब्दुल्ला यांनी केंद्र सरकारवर आरोप करताना दिल्लीतील केंद्र सरकारकडून जम्मू काश्मीरचा आवाज ऐकला जात नाही, असं म्हटलं. राहुल गांधी देखील काश्मिरी पंडित कुटुंबातून येतात. आम्ही त्यांचं स्वागत करत असल्याचं अब्दुल्ला म्हणाले. जम्मू काश्मीरमध्ये निवडणूक झाल्यास भाजपला त्यांची इथं ताकद नसल्याचं दिसून येईल, असं उमर अब्दुल्ला म्हणाले.

दरम्यान, भारत जोडो यात्रेच्या समारोपासाठी देशभरातील विविध विरोधी पक्षातील नेत्यांना आमंत्रण देण्यात आलं आहे. राजकीय पक्ष भारत जोडो यात्रेच्या समारोपाला उपस्थित राहणार का हे येत्या ३० जानेवारीला स्पष्ट होईल.

# अखिल भारतीय किसान सभेचा साताऱ्यात मोर्चा

## कृषी क्षेत्राच्या विविध मागण्यांसाठी जिल्हा प्रशासनास निवेदन

**सातारा :** अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने कृषी क्षेत्रातील विविध मागण्यांसाठी बुधवारी सकाळी सातारा जिल्हाधिकारी कार्यालय मोर्चा काढण्यात आला या मोर्चाचे नेतृत्व समितीचे सदस्य कॉम्रेड माणिक अवघडे आनंदी अवघडे दादा पाटील पांडुरंग देशमुख दीपक पाटोळे सुभाष लोहार यांनी केले.

मोर्च्याची सुरुवात राजवाड्यावरून करण्यात आली हा मोर्चा राजपथावरून पोवई नाका मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला किसान सभेच्या वतीने शेतीमालाला हमीभाव कायदा झालाच पाहिजे वीज विधेयक कायदा २०२० रद्द करावा शेतकरी भाजीपाला विक्रेत्यांना फेरीवाला कायद्याप्रमाणे संरक्षण द्यावे सर्व गरजूंना अन्नसुरक्षा कायदा २०१३ प्रमाणे सवलतीच्या दरात अन्नधान्य निवृत्त धारकांना पेन्शन योजना लागू करावी सातारा शहरातील फेरीवाला फेरीवाला फळ विक्रेता टपरीवाला कटलरीवाला भाजीविक्रेते यांना ओळखपत्र देऊन त्यांच्या उद्योगाला संरक्षण मिळावे बांधकाम कामगारांची नोंदणी सुलभ करणे देवस्थान इनाम जमीन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर करणे पुणे बेंगलोर ग्रीन फील्ड सुपर हायवेवर शेतकऱ्यांच्या शेतीमालाला पाचपट भाव मिळणे इत्यादी मागण्या यावेळी करण्यात आल्या. या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांना सादर करण्यात आले आंदोलकांनी जिल्हाधिकारी




कार्यालयावर प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला जोरदार निदर्शने केली हमीभाव कायद्यासाठी शेवटपर्यंत सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन उभारणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

## श्री रामदास स्वामींच्या पादुकांचे मंगळवारी साताऱ्यात आगमन



**सातारा : प्रतिनिधी**

राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचा प्रचार दौरा यावर्षी श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड च्या वतीने पुणे, मुंबई , डोंबिवली, मालाड,बोरिवली येथे आयोजित करण्यात आला होता. हा पादुका दौरा यशस्वी पूर्ण करून या पादुका सातारा येथे मंगळवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता येत आहेत. पोवई नाका- शिवाजी सर्कल येथे रामदास स्वामींच्या पादुकांचा आगमन, स्वागत समारंभ आणि भव्य मिरवणूक सोहळा यानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी साताराचे ज्येष्ठ वेदमूर्ती विवेक शास्त्री गोडबोले यांच्या हस्ते पादुकांचे स्वागत करण्यात येणार आहे.याप्रसंगी संपूर्ण सातारा जिल्ह्यातून शेकडो शिव समर्थ भक्त, दिंड्यांसह वारकरी संप्रदायाची भक्त मंडळी ही उपस्थित राहणार आहेत.

पादुकांचे स्वागत झाल्यानंतर भव्य मिरवणूक सोहळा पोवई नाका येथून सुरू होत मल्हार पेठ, शेटे चौक पंचमुखी गणेश मंदिर , मोती चौक,राजवाडा मार्गे समर्थ सदन येथे येणार आहे .

३१ जानेवारी रोजी समर्थ सदन येथे पादुकांचे आगमन झाल्यावर या पादुका एक फेब्रुवारी रोजी सकाळी श्री क्षेत्र सज्जनगडकडे निघणार आहेत अशी माहिती समर्थ सेवा मंडळाचे कार्यवाह योगेश बुवा रामदासी यांनी दिली आहे.

# चंदूकाका सराफ यांच्या 'दागिन्यांचं आपलं दुकान' प्रदर्शनाला अवश्य भेट द्या - हभप नवनाथमहाराज

**सातारा : प्रतिनिधी**

विश्वासार्हता, शुध्दता आणि कामातील सचोटी या गुणांमुळे चंदुकाका सराफ ॲन्ड सन्स यांनी संपुर्ण राज्यंभर ज्वेलरी क्षेत्रात आपला ठसा ग्राहकांच्या मनात साकारला आहे.

चंदूकाका सराफ अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेडने महाराष्ट्रातील सुवर्ण पेढ्यांमध्ये आपला नावलौकिक मिळवला असून सुवर्ण अलंकाराचे अनेक दागिने घडवत महाराष्ट्राची संस्कृती जपलेली आहे असे उद्गार युवा दर्पण पुरस्कार विजेते प्रेममूर्ती ह.भ.प. नवनाथ महाराज लिमण यांनी व्यक्त केले.

चंदुकाका सराफ न्ड सन्स प्रा. लि. यांनी शिरवळ येथे आयोजित केलेल्या दागिन्यांचं आपलं दुकान' या सोने व हिऱ्याच्या ।दागिन्यांच्या प्रदर्शनाच्या ।उद्घाटन प्रसंगी ह.भ.प. नवनाथ महाराज लिमण बोलत होते.



**दागिन्यांच्या प्रदर्शनाचा शुभारंभ करताना नवनाथ महाराज, उदयदादा कबुले, राजेंद्र तांबे, रविराज दुधगावकर, ताहेर काझी, दशरथ निगडे व अन्यं.**

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उदयदादा कबुले, माजी सभापती राजेंद्र तांबे, शिरवळ ग्रामपंचायतचे सरपंच रविराज दुधगांवकर, उपसरपंच ताहेर काझी, माजी सरपंच दशरथ निगडे, शंकरराव निगडे, ग्रामपंचयत सदस्यत व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सर्व मान्यवरांचे सन्मान व स्वागत चंदूकाका सराफ अँड सन्स प्रा. लि.चे सेल्स हेड प्रभातसर, व क्लेस्टरर हेड समीर दाभाडे यांनी केले. सदरचे प्रदर्शन दि. २७ ते २९ जानेवारी २०२३ या कालावधीत शिरवळमधील कै. तुकाराम संतोबा कबुले सांस्कृतिक भवन, केदारेश्वर मंदिराजवळ येथे स. १० ते रा ८. यावेळेत सुरू रहाणार आहे.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये शिरवळ वासियांसाठी खास ऑफर्स देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये हिऱ्यांच्या दागिन्यांच्या खरेदीसाठी घडणावळीवर शंभरटक्के पर्यंत सूट तसेच सोन्याच्या दागिन्यांसाठी घडणावळीवर दहा टक्के सूट देण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ग्राहकांना आपले आवडते दागिने 'इएमआय' योजनेअंतर्गत फक्त रू. नऊ हजार नऊशे नव्याण्णव भरून सहजपणे खरेदी करता येणार आहेत. उर्वरित रकमेसाठी चंदुकाका सराफ यांच्यातर्फे सोयीस्कर हप्त्यांची 'इएमआय' सुविधा देण्यात आलेली आहे. तसेच गोल्ड ट्री प्लस व कल्पतरू योजनेच्या ग्राहकांसाठी रू. तीन हजार व पुढील गुंतवणुकीवर चांदीचे नाणे भेट देण्यात येणार आहे. याच बरोबर ३ पायल घेतल्यास घडणावळीवर पंधरा टक्के पर्यंत सवलत जाहीर करण्यात आलेली आहे. यामध्ये १० ग्रॅमपासून ते १०० ग्रॅम वजनापर्यंतच्या व्हरायटीज् उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्टर्लिंग सिल्व्हरचे तीन दागिने खरेदीवर एमआरपी वर फ्लॅट वीस टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच जुना दागिना देऊन नवीन दागिना करताना जुन्या सोन्याला घट नसणार आहे. त्यामुळे शिरवळवासियांनी या ऑफर्सचा लाभ घेत, आपले आवडते दागिने घेण्यासाठी, 'दागिन्यांचं आपलं दुकान'ला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफ न्ड सन्स् प्रा. लि.यांच्यातर्फे करण्यात आले आहे.